**Newspaper: Maharashtra Times**

**Date: 26/09/2025**

**Pre-event article in Maharashtra Times about the *One-day international conference on* ESG Synergies: Integrating Sustainability, Governance & Growth across Disciplines scheduled on 27th September 2025.**

# पर्यावरणीय सामाजिक प्रशासनावर विचारमंथन

**गायत्री देव, आर. ए. पोदार महाविद्यालय**

महाराष्ट्र टाइम्स

मीडिया पार्टनर

भारतातील वाणिज्य आणि अर्थशास्त्र शिकवणाऱ्या नामांकित महाविद्यालयांपैकी एक असलेल्या आर. ए. पोदार वाणिज्य आणि अर्थशास्त्र स्वायत्त महाविद्यालयात शनिवार, २७ सप्टेंबर रोजी 'ईएसजी सिनर्जिज्: इंटिग्रेटिंग सस्टेनेबिलिटी, गव्हर्नन्स अँड ग्रोथ अक्रॉस डिसिप्लिन्स' या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित केली आहे. ईएसजी म्हणजेच पर्यावरण, समाज आणि प्रशासन या तीन घटकांचा विविध क्षेत्रांमध्ये होणारा परिणाम समजून घेणे, हा या परिषदेचा उद्देश आहे. 'महाराष्ट्र टाइम्स' या परिषदेचे माध्यम प्रायोजक आहेत.

शिक्षण प्रसारक मंडळीच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष ॲड. सोहनलाल जैन, महाविद्यालय विकास समितीचे अध्यक्ष सुनील जोशी, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. विनिता पिंपळे यांच्या नेतृत्वाखाली उपमुख्याध्यापक कपिलदेव इंदुरकर यांच्या संयोजनातून आणि संतोष पाटील यांच्या सहसंयोजनातून डॉ. वृषाली कणेरी, अक्षय शिनगारे यांच्या प्रयत्नांतून या परिषदेचे नियोजन करण्यात आले आहे.

येस बँकेच्या सस्टेनेबल फायनान्स विभागाचे सीएफओ निरंजन बानोडकर प्रमुख वक्ते असतील. मुख्य अतिथी म्हणून हेलिऑनच्या एशिया-पॅसिफिक विभागाच्या ज्येष्ठ अनुपालन अधिकारी शानू सक्सेना उपस्थित राहणार आहेत. पर्यावरणीय सामाजिक प्रशासन म्हणजेच ईएसजी ही सध्याच्या काळात प्रत्येक कंपनीसाठी महत्त्वाची बाब आहे. शिक्षण, अर्थशास्त्र, समाज, व्यवसाय अशा सर्वच क्षेत्रांमध्ये अशा प्रशासनाचा दीर्घकालीन परिणाम होणार आहे. या परिषदेत वाणिज्य, अर्थशास्त्र, साहित्य, पर्यावरण, गणित, अशा विषयांच्या दृष्टिकोनातून त्याचे वेगवेगळे पैलू मांडले जाणार आहेत. या परिषदेच्या वेगवेगळ्या सत्रांमध्ये प्राध्यापक, संशोधक, धोरणकर्ते, उद्योगतज्ज्ञांकडून विचारमंथन होईल.